# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### उमरेड- पवनी-कऱ्हांड (नागपूर) अभयारण्यात वाघीण आणि तिच्या ५ बछड्याचा रस्ता पर्यटकांनी रोखून धरला असल्याबाबत

**(१) ६२ (०९-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील उमरेड-पवनी-कऱ्हांड अभयारण्यात चार जिप्सी चालक व चार गाईड यांनी पर्यटकांसह एफ-२ नावाची वाघीण आणि तिच्या ५ बछड्यांचा रस्ता रोखून धरला असल्याची घटना दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अभायरण्यात भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्याच्यादृष्टीने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पर्यटकांवर कारवाई करण्याबाबत तसेच पर्यटकांसाठी नवीन मार्गदर्शक तत्वे तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) तसेच, उपरोक्त प्रकरणी संबंधित जिप्सी चालक, गाईड व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२२-०६-२०२६) :** (१) नागपूर जिल्ह्यातील उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यामधील कुही (वन्यजीव) वनपरिक्षेत्रातील गोठणगाव पर्यटक प्रवेश द्वार वर दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी सफारी मार्गावर घटना घडली होती.

(२) उप संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर व बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा व उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यमधील पर्यटक, जिप्सी चालक, निसर्ग मार्गदर्शक यांना जंगल सफारी करण्याबाबत नियमावली जारी करण्यात आली असून, त्याअन्वये समितीमार्फत दिशानिर्देश देण्यात आले आहेत.

संरक्षित क्षेत्रातील वाघ व पर्यावरणीय व्यवस्थेचे संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे. या घटनेमुळे निसर्ग पर्यटनाचे नियम आणि शिस्त अधिक कडक करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे. त्या अनुषंगाने वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने जंगल सफारी दरम्यान नियम व अटींचे काटेकोरपणे पालन होणे अत्यंत महत्वाचे आहे. याकरीता खालीलप्रमाणे सर्व क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता

सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

• पर्यटकांना सुरक्षित व शिस्तबध्द सफारीचा अनुभव देण्यासाठी सकाळ आणि दुपारच्या दोन्ही सफारी दरम्यान पर्यटन मार्गावर गस्त घालणे अनिवार्य आहे.

• सफारी दरम्यान घालून दिलेल्या नियम व अटींचे पालन न करणारे निसर्ग मार्गदर्शक किंवा जिप्सी चालक आढळल्यास त्यांच्यावर तात्काळ नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी.

• नियमभंगाच्या घटना, त्यांचेवर केलेली कारवाई तसेच गस्तीच्या वेळेचा अहवाल नियमितपणे उप संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर यांचेकडे सादर करावा.

जंगल सफारीच्या दरम्यान वन्यजीव संरक्षण व पर्यावरणाच्या संवर्धनास प्राधान्य दिले जावे. पर्यटकांमध्ये शिस्त व सकारात्मक दृष्टीकोन प्रस्थापित करण्यासाठी वरील सूचनांचे काटेकोर पालन होईल यांची दक्षता घेण्यात यावी.

(३) संबंधित पर्यटक मार्गदर्शक व जिप्सी चालक यांनी पर्यटन नियमांचे उल्लंघन केल्याने तसेच प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता वनपरिक्षेत्र अधिकारी, कुही यांनी दिनांक ०३/०१/ २०२५ ते ०३/०४/२०२५ या कालावधीकरीता एकूण ८ लोकांवर निलंबनाची कार्यवाही करून ४ जिप्सी चालक यांचेवर प्रत्येकी रुपये ४०००/- एवढा दंड आकारण्यात आलेला आहे. तसेच ४ पर्यटक मार्गदर्शक यांचेवर प्रत्येकी रुपये १०००/- एवढा दंड आकारण्यात आलेला असून त्यांचेवर २३७७२६/ २०२५ दिनांक ०३/०१/२०२५ अन्व्ये वन गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे शहरातील इमारती व गृहसंकुलांना जिल्हा प्रशासनाने अकृषिक कर भरण्यासंबंधीच्या नोटीसा पाठविल्याबाबत

**(२) १११ (०९-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील इमारती आणि गृहसंकुलांच्या अकृषिक करवसूलीस तत्कालीन महसूल मंत्री यांनी स्थगिती दिली असून तसेच शासनाने अकृषिक कर पूर्णत: माफ करण्याचा निर्णय माहे डिसेंबर,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकृषिक कर वसूलीस तत्कालीन महसूल मंत्री यांनी स्थगिती दिली असून तसेच शासनाने सदर अकृषिक कर पूर्णत: माफ करण्याचा निर्णय घेऊनही माहे जानेवारी,२०२५ मध्ये अकृषिक कर भरण्यासंबंधीच्या नोटीसा पाठविल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगांने ठाणे शहरातील इमारती व गृहसंकुलांना पाठविण्यात आलेल्या नोटीसांबाबत काय कार्यवाही केली आहे वा याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२५-०२-२०२६) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

राज्यातील निवासी, वाणिज्य व औद्योगिक वापराखालील जमिनीवरील संपूर्ण अकृषिक कर रद्द करण्याचा निर्णय दिनांक ०४/१०/२०२४ रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आला होता.तथापि, सदर निर्णयाचे प्रशासकीय कारणास्तव कायद्यात रुपांतरण झाले नाही. मात्र दिनांक ०४/११/२०२५ रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्यातील अकृषिक कर आकारण्याबाबतच्या तरतूदी रद्द करण्याबाबतचा निर्णय घेतला असून त्यानुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५, दिनांक ३१/१२/२०२५ नुसार, अकृषिक कर आकारणीच्या तरतुदी रद्द करण्यात आल्या आहेत. सदर सुधारणा अधिनियमाच्या कलम ४७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एक रकमी रुपांतरण अधिमूल्य आकारण्यात येणार आहे.

तसेच, सदर सुधारणेच्या अनुषंगाने महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक एनएपी-२०२५/प्र.क्र.१७७/जमीन-०१अ, दिनांक १०/०२/२०२६ अन्वये राज्यातील बिनशेती झालेल्या मिळकतींवर दरवर्षी आकारला जाणारा अकृषिक कर आकारण्यात येवू नये, तसेच सदर सुधारणेच्या दिनांकापर्यंत दरवर्षी आकारला जाणारा थकीत अकृषिक कर वसूल करण्यापासून सूट देण्यात येत असल्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोकणातील आंबा, काजू बागांसह इतर फळपिकांचे नुकसानीबाबत

**(३) १८० (०९-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात माकडांच्या वाढलेल्या उपद्रवामुळे काजू बागांसह इतर फळपिकांचे तसेच नव्याने सुरू झालेल्या आंबा पिकांचेही नुकसान होत असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणातील आंबा, काजू बागांसह इतर फळपिकांचे नुकसान होऊ नये याकरीता माकडांचा उपद्रव थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (१६-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) कोल्हापूर वनवृत्तातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये आंबा, काजू बागांसह फळपिकांचे नुकसान करणाऱ्या माकडांचा बंदोबस्त करण्याच्यादृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

• जलद बचाव पथक यांची स्थापना करणेत आलेली असून, यांचेमार्फत माकड/वानरांचा उपद्रव असणाऱ्या संवेदनशील क्षेत्रातील माकडांचा बचाव करुन त्यांना नैसर्गीक अधिवासात सोडण्यात येते.

• माकड/वानर यांच्यामुळे फळझाडांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन माकड/वानर यांचे निर्बीजीकरण करण्याकरीता प्रधान मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स समितीने सुचविलेल्या उपाययोजनेच्या डाटा संकलन करणेत आलेले आहे.

• माकडांपासून होत असलेल्या नुकसानीकरीता शासन राजपत्र दिनांक ०१/०२/२०२४ मधील तरतुदीनुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जात आहे.
• तसेच राज्य मानवी वस्तीत प्रवेश करणारी माकडे/वानरे यांना पकडणे व अधिवासात सोडणे याकरीता शासनाने दिनांक २५/११/२०२५ रोजी च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमीत केल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे जोगेश्वरी (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील अतिक्रमीत रहिवाशांना मालकी हक्क नोंदी मिळणेबाबत

**(४) २५० (०७-०४-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे जोगेश्वरी (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील गट नं. १४ मधील शासकीय गायरान जमिनीवर सन १९९५ पुर्वीपासून झोपडपट्टी असून सदर झोपडपट्टीतील रहिवाशी हे सर्व कामगार मजुर असून ते उदरनिर्वाहासाठी वाळुज एमआयडीसीमध्ये रोजंदारीची कामे करित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१६ पासून सदर रहिवाशी ग्रामपंचायतीस मालमत्ता कराचा भरणा करित असून ग्रामपंचायतीने त्यांना भौतिक सोई-सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रहिवाशांनी मालमत्ता कराचा भरणा करुनही उक्त जमिनीवर त्यांच्या नावे मालकी हक्काच्या नोंदी घेतल्या जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मौजे जोगेश्वरी येथील सदर जागेवरील अतिक्रमण नियमित करुन रहिवाशांना मालकी हक्क देण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२५-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे
(२) हे अंशत: खरे आहे
(३) व (४) सदरची जमीन ही शासकीय गायरान वर्ग-२ ची असल्याने शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १२ जुलै, २०११ मधील तरतुदीनुसार अतिक्रमण धारकांचे नाव ७/१२ उताऱ्याच्या मालकी हक्कात घेता येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यात नागरी वस्तीमध्ये वन्य प्राण्यांचा वाढता वावर रोखण्याबाबत

**(५) ४४१ (०७-०४-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील लाखनी, अड्याळ व लाखांदूर वनविभागात तसेच तई बु. गावालगत (ता.लाखांदूर) गेल्या महिनाभरापासून ‘बीटी १०’ या वाघाचा नियमित वावर सुरू असून नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे माहे जानेवारी २०२५ च्या पहिल्या आठवड्यामध्ये वा

त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील वन्य प्राण्यांचा नागरी वस्तीत होणारा वावर रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२५-०२-२०२६) :** (१) व (२) भंडारा वनविभागांतर्गत लाखनी वनपरिक्षेत्रात बीटी-१० या वाघिनीच्या अवयस्क नर शावकाचा वावर आढळून आला होता.सदर वाघाने लाखनी वनपरिक्षेत्रात कोणत्याही प्रकारची मनुष्यहानी व पशुहानी केलेली नाही. तद्नंतर अड्याळ वनपरिक्षेत्रात याच वाघाने ११ पाळीव पशुहानीच्या घटना केलेल्या आहेत. सदर वाघाचे गावाजनीकचे परिसरातील वास्तव्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. लाखांदूर वनपरिक्षेत्रांतर्गत मौजा-तई बु., हरदोली, पाचगाव, तिरखुरी या गावांमध्ये त्याचे नियमित वास्तव्य होते. दिनांक ०८/०१/२०२५ रोजी मौ-तई बु. येथे सदर वाघाने मानवी अधिवासात प्रवेश केला होता.सदर शावकास जेरबंद करून नैसर्गिक अधिवासात त्याच दिवशी सोडण्यात आले होते.

वन्य प्राण्यांचा नागरी वस्तीत होणारा वावर रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

•गावातील शेत शिवारात वाघाचे अस्तित्व आढळून आल्यास वनपरिक्षेत्र स्तरावर कार्यरत वनकर्मचाऱ्यांचे संयुक्त पथक तयार करून तसेच संयुक्त वन व्यवस्थापन समिती मधील सदस्याचा व गावकऱ्यांचा समावेश करून जंगलामध्ये गस्ती करण्याचे कामे सुरू करतात.
•जंगलालगतचे शेतली क्षेत्रात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना समुदायाने काम करण्याच्या सूचना दिल्या जातात.
•कॅमेरा ट्रॅप व PIP या पध्दतीद्वारे वाघांच्या हालचालीवर सनियंत्रण ठेवली जाते.
•वन्यप्राणी यांचे वास्तव असलेल्या स्थानिकांनी जंगलक्षेत्रात प्रवेश प्रतिबंध करण्यात येतो व गावकऱ्याकडून वाघाचे अस्तित्वासंबंधी प्राप्त माहितीच्या अनुषंगाने मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्यासाठी तात्काळ प्रतिसादर दिला जातो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## आंबा फळाचे धोरण ठरविणाऱ्या समितीमध्ये आंबा उत्पादक शेतकरी वर्गाचा समावेश करण्याबाबत

**(६) ६५२ (०९-०४-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यासाठी तसेच दर ठरविण्यासाठी आंबा उत्पन्न घेण्याऱ्या समितीमध्ये तसेच आंबा निर्यात समितीमध्ये आंबा उत्पादक शेतकरी वर्गाचा समावेश करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंब्याचे उत्पन्न वाढण्यासाठी उत्पादक शेतकरी वर्गाचा समितीमध्ये समावेश करुन आयात - निर्यात समन्वयांची भूमिका शासनाने राबविल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीस मदत होऊ

शकेल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (०२-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही, अशी कोणतीही समिती राज्य शासनाने गठित केलेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची नावे महापुरुषांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याबाबत

**(७) ७४४ (०८-०४-२०२५) श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची नावे महापुरुषांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने केंद्र शासनाकडे शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची नावे महापुरुषांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) व (२) भारत सरकारच्या Indian Council of Historical Research चे (भारतीय इतिहास अनुसंधान परिषदेचे) राष्ट्रपुरूष घोषित करण्याबाबत कोणतेही "धोरण अगर मार्गदर्शक तत्व" नाही. परिषदेकडे राष्ट्रपुरूषांबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नाही, असे सदस्य सचिव, Indian Council of Historical Research यांनी त्यांच्या दिनांक २०/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. भारतीय इतिहास अनुसंधान परिषदेच्या पत्रावरून असे स्पष्ट होते की, केंद्र शासनाकडे राष्ट्रपुरूषांची कोणत्याही प्रकारची यादी नाही. तसेच, राष्ट्रपुरूष घोषित करण्याबाबत काही तरतूद अगर धोरण नाही. राष्ट्रपुरूष ही अधिक व्यापक व राष्ट्रव्यापी संकल्पना असल्याने राष्ट्रपुरूष घोषित करण्याबाबत राज्यशासनाचे देखील कोणतेही धोरण नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राबविण्यात आलेल्या उपक्रमाबाबत

**(८) ७४६ (०९-०४-२०२५) श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त १०० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निधी कोणकोणत्या विशेष बाबींवर खर्च करण्यात आला आहे तसेच निधीची अंमलबजावणी कोणत्या विभागांनी केली आहे,
(३) तसेच, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जीवनपटावर चित्रपट बनविण्यात आला आहे काय व तो चित्रपट कोणता आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी कार्यक्रमाचे नियोजन व सनियंत्रण करण्यासाठी दिनांक ३०/०७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली "लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी कार्यक्रम संनियंत्रण समिती" गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या दिनांक ११/३/२०२० च्या बैठकीत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्याविषयी वर्षभरातील कार्यक्रमांची रुपरेषा निश्चित करण्यात आली असून; विभागाच्या दिनांक २०/०३/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये १००.२४ कोटी (अक्षरी रूपये शंभर कोटी चोविस लक्ष फक्त) इतक्या निधीची रूपरेषा आखण्यात आलेली होती. यामध्ये लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनावर आधारीत चित्रपटाकरीता रुपये ५.०० कोटी इतका निधी अंदाजित प्रस्तावित करण्यात आला होता.तथापि, कोविड-१९ या महामारीच्या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाचे आयोजन करता आले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यामध्ये जीएम कापूस वाणांच्या संशोधनास प्रोत्साहन देण्याबाबत

**(९) ३८९८ (१७-०७-२०२५) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कापूस वाणांमध्ये जनुकीय सुधारणांचा (जीएम) कार्यक्रम प्रभावीपणे न राबविल्यामुळे राज्यातील तसेच देशातील कापसाच्या उत्पादकतेत घट झाल्याची बाब मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जनुकीय सुधारणांचा अभाव राहिल्यामुळे कापसाचे उत्पादन घटणे तसेच त्यावर रोगराईचा प्रादुर्भाव वाढणे यांसारख्या अनेक समस्यांमुळे कापूस पट्ट्यातील शेतकऱ्यांमध्ये आर्थिक अडचणी निर्माण होऊन आत्महत्यांचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कापूस वाणांमध्ये जनुकीय सुधारणा न केल्यास भविष्यात देशाला कापसाची आयात करावी लागण्याची व त्यामुळे कापूस उद्योग व कापड उद्योगही संकटात सापडण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, उपरोक्त पार्श्वभूमीवर कापूस वाणांमध्ये जनुकीय सुधारणा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (२३-०६-२०२६) :** (१) राज्यातील तसेच देशातील कापसाच्या उत्पादकतेत घट होण्यामागे केवळ जनुकीय सुधारणांचा (जीएम) कार्यक्रम प्रभावीपणे न राबविणे हे एकमेव कारण नाही. हवामानातील बदल, अनियमित पर्जन्यमान, वाढता कीड-रोग प्रादुर्भाव, मृदा आरोग्याची हानी, तसेच उत्पादन खर्चात वाढ इत्यादी अनेक घटकांचा एकत्रित परिणाम उत्पादकतेवर झालेला आढळून येतो.
(२) कापूस पिकामध्ये गुलाबी बोंडअळी व इतर कीड-रोगांचा प्रादुर्भाव, हवामानातील अनिश्चितता व बाजारभावातील चढ-उतार यांमुळे काही भागांत शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) भविष्यात देशाला कापसाची आयात करावी लागण्याची शक्यता ही देशांतर्गत उत्पादन, मागणी-पुरवठा स्थिती, हवामान परिस्थिती व जागतिक बाजारपेठेतील घडामोडीवर अवलंबून असते.
(४) जीएम वाणाच्या संदर्भातील धोरणात्मक निर्णय हे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार घेतले जातात. पर्यावरणीय, जैवसुरक्षा व कायदेशीर बाबींचा पूर्तता आवश्यक असल्याने त्यानुसार प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येते.

कापूस वाणांमध्ये जनुकीय सुधारणा करण्याबाबत विद्यापीठ स्तरावर संशोधन सुरू असून बीटी कपाशीचे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांचेकडून ICAR-CICR-PDKV ०८१BT, ICAR-CICR-Rajat BT, PDK Hybrid-२ BG-२, PDKY JKL-११६ (BG II) व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापिठ, परभणी यांचेकडून NH १९०१ Bt, NH १९०२ Bt, NH १९०४ Bt ही वाण विकसित करून प्रसारीत करण्यात आली आहेत. तसेच मोठ्या बोंडाच्या आकाराचे अधिक रूईचा उतारा असणारे बीटी (बीजी-२) वाण तयार करण्याबाबत संशोधन सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुरखेडा (ता.रावेर जि.जळगाव) येथील ३५ कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१०) ४०५१ (१७-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुरखेडा (ता.रावेर जि.जळगाव) येथील ३५ कुटुंबांचा पुनर्वसन अद्याप संपूर्ण न झाल्याने, ग्रामस्थांनी जलसमाधी आंदोलन करण्याचे दिनांक १५ मे,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धुरखेडा (ता.रावेर जि.जळगाव) येथील ३५ कुटुंबांचा पुनर्वसन करण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील)(०१-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) मौजे धुरखेडा येथील बाधित ३५ घरांचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने दिनांक २६/११/२०२५ रोजी जिल्हाधिकारी, जळगाव यांचे अध्यक्षतेखाली सदर घरांच्या पुनर्वसनाबाबत बैठक आयोजित करण्यात

आली होती. सदर बैठकीमध्ये गट क्र. ६,१२,१६ व ७१ चे स्थळ निरीक्षण करुन स्थळ निरीक्षण अहवाल सादर करण्याबाबत अप्पर जिल्हाधिकारी जळगाव, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) जळगाव, उपविभागीय अधिकारी फैजपूर निर्देश दिले आहेत.
(३) मौजे धुरखेडा ता.रावेर येथील ३५ घरांचे विशेष बाब म्हणून पुनर्वसन करण्याकरीता खाजगी शेतजमीन मालकांचा विरोध असल्याने तेथील पुनर्वसन रखडले आहे.

---

## नंदुरबार जिल्ह्यात तापी नदी पात्रातून बेकायदेशीर रित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

**(११) ४०७१ (१०-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यातून गुजरात राज्यात वाहत जाणाऱ्या तापी नदीतून बेसुमार व अमर्याद वाळू उपसा केल्यामुळे पर्यावरणाची हानी होत असून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याचे लोकप्रतिनिधीनी दिनांक १३ ऑगस्ट, २०२४ रोजी प्रधान सचिव व मुख्य सचिव यांच्याकडे पत्राद्वारे निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर होणाऱ्या बेसुमार वाळू उपसा व वाळूच्या वाहतुकीमुळे रस्त्याची व पुलाची दुरवस्था होत असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाचा कोटयवधी रुपयांचा महसूल बुडविण्याऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०३-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

मा.श्री.आमश्या पाडवी, विधानसभा सदस्य यांनी नंदुरबार जिल्ह्यातून गुजरात राज्यात वाहत जाणाऱ्या तापी नदीतून गुजरात राज्यामध्ये बेसुमार व अमर्याद वाळू उपसा केल्यामुळे पर्यावरणाची हानी होत असून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याबाबत पत्र दिले आहे. सदर पत्रातील मुद्यांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी तापी- गुजरात राज्य यांना जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी दिनांक २६/०८/२०२४ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(२) हे खरे आहे.

गुजरात राज्याच्या हद्दीत उत्खनन करुन सदर वाळूची वाहतूक नंदुरबारसह इतर जिल्ह्यात केली जाते. त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील रस्त्याची व पुलाची काही अंशी दुरावस्था झाल्याचे दिसून येते.
(३) वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ मध्ये परराज्यातुन येणाऱ्या वाळूच्या सनियंत्रणाबाबत तरतूदी केल्या आहेत. त्यामध्ये गुजरात राज्याच्या प्रशासनाने मान्यता प्रदान केली आहे त्यांनाच महाराष्ट्र राज्यात जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश करणाऱ्या वाहनास दुय्यम पासेस (E-Tp) देण्यात येते. त्यानुसार अर्जदारास अर्ज सादर करतांना पॅन कार्ड, आधार कार्ड, त्या राज्यातील वाळूघाट/डेपो/ साठा-विक्री परवाना आदेश व प्रत्येक वर्षी परराज्यात वाळू वाहतूक करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या परिमाणाची (टनामध्ये) प्रत सादर करणे बंधनकारक केले आहे. त्यावर जिल्हाधिकारी यांनी अर्जाची तपासणी करुन त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह व संपूर्ण कागदपत्रासह परिपूर्ण प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर केल्यानंतर शासनामार्फत परवाना मंजूर करण्याची तरतूद केली आहे.

तसेच,राज्यात प्रवेश करणाऱ्या वाहनासोबत, प्रवेश केलेल्या जिल्ह्यातील e-TP सोबतच अंतिम ठिकाणापर्यंत वाळू वाहतूक होईपर्यंत ज्या-ज्या जिल्ह्यातून सदर वाहन मार्गक्रमन करील त्या-त्या जिल्ह्यांची ऑनलाईन e-TP अनिवार्य केली आहे.

वैध परवान्यापेक्षा जास्त वाळू आढळल्यास अथवा दुय्यम पासेस (E-Tp) शिवाय वाहतूक केल्याचे आढळून आल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या ४८ (७) व ४८ (८) नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येते.

नंदुरबार जिल्ह्यात अवैध वाळू वाहतूक होऊ नये या करीता पूर्ण वेळ महसूल व पोलीस विभागाच्या पथकामार्फत कारवाई करण्यात येते. त्यानुसार नंदुरबार जिल्ह्यात सन २०२४-२५ मध्ये ५५ तसेच दिनांक १/०४/२०२५ते ३०/०६/२०२५ अखेर ६ असे एकूण ६१ अवैध वाळू वाहतूक प्रकरणी कारवाई करून अनुक्रमे ६४.४३ लक्ष व ६.३६ लक्ष एकूण ७०.७९ लक्ष दंड वसुल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शेतकऱ्याला पीक विम्याचा परतावा मिळाला नसल्याबाबत

**(१२) ४३१० (१७-०७-२०२५) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शेतकऱ्यांकडून महसूल विभागामार्फत सन २०२३-२४ या वर्षातील पीक विमा भरून घेण्यात आलेला असून परतावा देताना काही महसुली निकष लावण्यात आल्यामुळे एकही शेतकऱ्याला पीक विम्याचा परतावा मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पीक विमा परताव्यासाठी हवामान मापक केंद्राचे निकष लावण्यात आले असून पीक विमा भरताना राजापूर तालुक्यानुसार रक्कम घेण्यात येत असून परतावा मात्र लांजा तालुक्याच्या हवामान केंद्राच्या निकषांनुसार देण्यात येणार असल्याची पूर्वकल्पना शेतकऱ्यांना देण्यात आली नव्हती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पीक विमा परताव्यासाठी हवामान मापक केंद्राचे निकष लावण्यामागील कारणे काय तसेच शेतकऱ्यांना योग्य व वेळेवर पीक विमा परतावा मिळावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (२३-०६-२०२६) :** (१), (२) व (३) जिल्ह्यातील सर्व तालुक्यासाठी विमा हप्ता एक समान असतो.

विमा नुकसान भरपाई अदा करताना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार त्या-त्या महसूल मंडळाकरीता ठरवून दिलेल्या हवामान केंद्रावर नोंदल्या गेलेल्या हवामानाची आकडेवारी आणि फळपीकनिहाय प्रमाणके यांची सांगड घालून दिली जाते. त्यानुसार पात्र विमाधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध भागांमध्ये देवस्थान जमिनींचा गैरवापर होत असल्याबाबत

**(१३) ४३१२ (१७-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण विभागासह राज्यातील विविध भागांमध्ये देवस्थान मालकीच्या जमिनींचा गैरवापर होत असून महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने भूमाफियांकडून सदर जमिनी बेकायदेशीररीत्या ताब्यात घेतल्याची बाब माहे एप्रिल–मे २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या नोंदीनुसार राज्यात देवस्थानाच्या मालकीच्या असलेल्या जमिनीवर बेकायदेशीररित्या कब्जा अथवा अनधिकृत हस्तांतरण करुन नोंदी केल्याबाबतच्या अनेक तक्रारी गेल्या पाच वर्षांत प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धार्मिक संस्थांच्या मालमत्तेच्या संरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच देवस्थान जमिनींच्या बेकायदेशीर हस्तांतरणाला आळा घालण्यासाठी ‘अँटी लँड ग्रॅबिंग कायदा’ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) वरील कार्यवाही न झाल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२५-०२-२०२६) :** (१)व (२) होय,अंशत: खरे आहे.

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये देवस्थानांच्या मालकीच्या जमिनींचा गैरवापर झाल्याचे आढळून आले आहे. तथापि, शासन परिपत्रक दिनांक ३० जुलै, २०१० व शासन परिपत्रक दिनांक ०६/११/२०१८ अन्वये देवस्थान जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण झाल्याचे निदर्शनास आल्यास अशी प्रकरणे पुनरिक्षणात घेवून तातडीने निकाली काढण्याच्या सूचना सर्व महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व विभागात देवस्थान जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरणाचा शोध घेऊन सदर जमिनी पुन:श्च देवस्थानाच्या नावे करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते.

(३) राज्यातील देवस्थान इनाम जमिनींच्या संदर्भात राज्य शासनाची भूमिका ठरविण्याकरीता शासनास शिफारशी करण्यासाठी प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल अंतिम करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

देवस्थानांच्या जमिनी बळकाविण्यासंदर्भात ॲन्टी लँड ग्रॅब्रिंक कायद्यातील तरतुदीप्रमाणे काही तरतुदी करण्याबाबतचा विषय विभागाकडून सदर समितीच्या बैठकीत चर्चेला घेवून त्यावर समितीचा अहवाल अंतिम झाल्यानंतर त्यानुषंगाने शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी व सिंधुदुर्ग किल्ल्याच्या विकास कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) ४३१७ (१७-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिरासाठी दरमहा रुपये ५०,०००/- अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठी दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी हिंदु जनजागृती समितीच्या शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनवर मा.उपमुख्यमंत्री यांनी महसूल विभागास प्रस्ताव सादर करण्याबाबतचे निदेश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निदेशानुसार महसूल विभागाकडून याबाबत प्रस्ताव तयार करण्यात आला आहे काय व सदर विषयावर शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे काय, तसेच उपरोकत प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०२६) : (**१) होय, हे खरे आहे.
(२) शिवराजेश्वर मंदिर, किल्ले सिंधुदूर्ग ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराजेश्वर मंदिराच्या दिवाबत्ती, पुजारी तसेच सेवेकऱ्यांच्या मानधनावरील खर्च अनुदानात प्रतिमाह रुपये ८३३३/- प्रमाणे वर्षासन रुपये १ लाख इतके अनुदान शासन निर्णय, महसूल व वन विभाग दिनांक २० मे, २०२६ अन्वये मंजूर करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१५) ४५२६ (१७-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय आश्रमशाळांसाठी मंजूर असलेल्या एकूण ७,१९७ चतुर्थ श्रेणी पदांपैकी सध्यस्थितीत सुमारे ३,४४३ पदे रिक्त असल्याची बाब दिनांक १२ जून, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदांपैकी स्वयंपाकी व मदतनिस या संवर्गातील एकूण २,६१२ पदांचा समावेश असून तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची देखिल ५१६ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, राज्यातील शासकीय आश्रमशाळेतील रिक्त पदे भरुन आश्रमशाळांतील कार्यक्षमता सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके (०२-०३-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाच्या दिनांक १६/११/२०२२ रोजीच्या सुधारीत आकृतीबंधानुसार शासकीय आश्रमशाळेसाठी चतुर्थ श्रेणी संवर्गाची एकूण १५४९ नियमित पदे मंजूर आहे. शासकीय आश्रमशाळेत चौकीदाराची २६९ पदे रिक्त आहे
(३) शासकीय आश्रमशाळेतील बिगर अनुसूचित क्षेत्रातील सरळसेवेच्या कोट्यातील शिक्षकांची व शासकीय आश्रमशाळां / वसतिगृहांमधील चौकीदाराची नियमित रिक्त पदे पूर्ण क्षमतेने भरण्यास शासनाने

मान्यता दिली आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ११/०२/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पेसा क्षेत्रातील पदभरतीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहे. याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसईतील २९ गावे वसई-विरार महानगरपालिकेमध्ये समाविष्ट केल्याने शेतकरी वर्गाला कृषी विभागांच्या योजनांचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(१६) २१६६५ (०३-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसईतील २९ गावे महानगरपालिकांमध्ये समाविष्ट असल्याने येथील शेतकरी वर्गाला कृषी विभागांतर्गतच्या योजना व सेवा-सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे, तसेच १० हजारांहून अधिक शेतकऱ्यांना पीक किसान योजने लाभ मिळत नसल्याचे दिनांक १०/०९/२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने शेतकऱ्यांना पीक किसान योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (२६-०२-२०२६) :** (१) होय
(२) वसई मधील २९ गावे दिनांक १३/०८/२०२५ रोजीच्या अधिसूचनेन्वये वसई-विरार महानगर पालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. सदरहू २९ गावे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या पोर्टलवर दिनांक ३०/११/२०२३ पासून मॅप करण्यात आली असून, सदर गावातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ देण्यास सुरुवात करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील पाळीव प्राण्यांवर बिबट्याच्या हल्ल्यांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(१७) २२००८ (०४-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील पंधराहून अधिक गावात दररोज पाळीव प्राण्यांवर बिबट्यांच्या हल्ल्यात वाढ झाली असल्याने सदर गावे बिबट्याच्या दहशतीखाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निफाड तालुक्यातील १५ हून अधिक गावांची बिबट्यांपासून सुटका करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२२-०६-२०२६) :** (१) निफाड तालुक्यामध्ये माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये ०६ गावांमध्ये बिबट हल्ल्याच्या घटना घडलेल्या आहेत. सदर गावांपैकी मौजे-वेळापूर येथे एकाच बिबट्याने पाळीव प्राणी बकरी संख्या-३ यांना ठार केले आहे. मौजे-करंजी खु. येथे बकरी संख्या-०१ व वासरी संख्या-०१ यांना ठार केले आहे. मौजे-खाणगाव थडी येथे बोकड संख्या-०१ ठार केले आहे. मौजे-औरंगपूर येथे वासरी संख्या-०१ ठार केले आहे. मौजे-जळगाव येथे गोऱ्हा संख्या-०१ ठार केले आहे. असे एकूण ०८ पाळीव प्राण्यांना बिबट्याने ठार केले आहे.

महाराष्ट्र वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ अन्वये नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

(२) बिबट्याचा लोकवस्तीतील हल्ले रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात: • वनक्षेत्रालगत असलेल्या स्थानिक लोकवस्तीमध्ये दंवडीद्वारे, प्रबोधनाद्वारे जनजागृती करण्यात येते.

• ज्या ठिकाणी बिबट्यांचा वावर आहे त्या ठिकाणी सूचना फलक लावून मार्गदर्शनपर प्रबोधन केले जाते.

• वनविभागातील क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी नियमितपणे गस्त घालत असतात.

• बिबट प्रवण क्षेत्रात नियमित गस्त घालण्यात येते.

• लोकसहभागासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे सहकार्य घेतले जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर तालुक्यातील कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१८) २२०२४ (०३-०१-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी विविध योजना कृषी विभागांमार्फत राबविण्यात येत असताना कोल्हापूर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या ५० पदांपैकी १९ पदे रिक्त असून जिल्ह्यातील १७ कृषी सहाय्यकांवर १२१ गावांचा कार्यभार देण्यात आला असल्याने शासकीय योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहण्यास अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कोल्हापूर जिल्ह्यातील कृषी विभागातील रिक्त पदांचा आढावा घेवून सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (२५-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

तालुका कृषी अधिकारी, करवीर (मुख्यालय कोल्हापूर) यांच्या कार्यालयासाठी महाराष्ट्र कृषी सेवेतील एकूण ४९ पदे मंजूर असून त्यापैकी सद्य:स्थितीत ४७ पदे भरलेली आहेत. त्यापैकी कृषी सहायक संवर्गातील ३७ मंजूर पदांपैकी ३५ पदे भरलेली आहेत. २ पद रिक्त आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांपर्यंत शासकीय योजना पोहचवण्यात अडचण येत नाही.

(२) वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२०२२ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार ज्या प्रशासकीय विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही अशा विभागांना त्यांच्याकडील रिक्त पदांच्या ८० टक्के पदे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार कोल्हापूर विभागात सहाय्यक कृषी अधिकारी संवर्गाच्या सरळसेवा कोटयाच्या बिंदू नामावली, नोंदवह्या मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडून प्रमाणित करुन घेण्यात आल्या आहेत. उप कृषी अधिकारी यांच्या पदांची ऑनलाईन परीक्षा दिनांक १६-१९ जानेवारी, २०२४ रोजी घेण्यात येऊन २४४ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

गट-क संवर्गातील लिपिक संवर्गातील २२ पदांपैकी २० पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

वरिष्ठ लिपिक संवर्गातील १४ पदे, सहाय्यक अधीक्षक संवर्गातील ४ पदे सरळसेवा भरतीने भरण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील उजनी प्रकल्पातील पुनर्वसित गावांच्या समस्या सोडविणेबाबत

**(१९) २२२३४ (०४-०१-२०२४) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने उजनी जलाशयाकरीता करमाळा व माढा तालुक्यातील ४१ गावांतील प्रकल्पबाधित धरणग्रस्तांना पुनर्वसनाकरीता नवीन गावठाणात घरांसाठी भूखंड वाटप केले असून सदर नागरीकांना प्राथमिक नागरी सुविधा देण्यासाठी गावठाणांचा ताबा पुनर्वसन विभागाकडे ठेवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसन भूखंडावर महाराष्ट्र शासन नोंद असणे, त्याच भूखंडाची भूमी अभिलेख रेकॉर्डला वेगळया नावे व क्रमांकाने नोंद असणे, पुनर्वसन वाटप रजिस्टरला वेगळा प्लॉट क्रमांक असणे व ग्रामपंचायत नमुना आठला वेगळीच नोंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पुनर्वसित गावांच्या समस्या सोडविण्यासाठी व पुनर्वसन कायद्यातील तरतुदीप्रमाणे संबंधित गावांना नागरी सुविधा मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) (१६-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे,

उजनी जलाशयाकरीता करमाळा तालुक्यातील ३० व माढा तालुक्यातील ११ गावठाणासाठी भुखंड वाटप केलेले असून नागरी सुविधा देण्यासाठी गावाठाणांचा ताबा जिल्हा परीषदेकडे हस्तांतरणाबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

करमाळा तालुक्यातील ८ गावाच्या मिळकत पत्रिका तयार झाल्या असून वाटप केलेल्या काही भुखंडावर प्रकल्पग्रस्तांच्या नावाची नोंद आहे. माढा तालुक्यातील ११ पुनर्वसीत गावठाणांपैकी ९

गावठाणांचे ड्रोनव्दारे सर्व्हे पूर्ण झालेला असून चौकशी पूर्ण झालेली आहे. उर्वरीत २ गावठाणांचा सर्व्हे पूर्ण झालेला असून चौकशी सुरु आहे.

तसेच करमाळा व माढा तालुक्यातील पुनर्वसीत गावठाणांचे काही ठिकाणी ७/१२ तयार झाले असून नोंदी घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या भुखंडाबाबत काही प्रकरणी खरेदी विक्री झाली असल्याने मिळकत पत्रिका व ७/१२ नोंदीत तफावत निर्माण झालेली आहे. याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याची दक्षता घेणेत येत आहे.

(३) उजनी प्रकल्पातील वरील पुनर्वसीत गावठाणांतील बहुतांश नागरी सुविधा पूर्ण झालेल्या असून अपूर्ण नागरी सुविधांबाबत कार्यवाही करणेत येत आहे. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसीत गावठाणातील समस्यांबाबत विशेष मोहीम राबवून कार्यवाही करणेबाबत तसेच, नागरी सुविधांचा आढावा घेवुन प्रस्ताव सादर करणेबाबत दिनांक १२/०९/२०२५ रोजीच्या बैठकीत विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोपरगाव (जि.अहिल्यानगर) तालुक्यात आणि परिसरातील बिबट्याचा बंदोबस्त करण्याबाबत

**(२०) २२६७४ (०३-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव शहर (ता.कोपरगाव, जि.अहिल्यानगर) आणि परिसरात गेल्या दोन तीन दिवसापासून बिबट्याचा वावर असल्यामुळे नागरिकांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाने पिंजरे लावून या बिबट्याचा बंदोबस्त करण्यासंबंधात स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी व तहसिलदार यांना निवेदन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२२-०६-२०२६) :** (१) अहिल्यानगर वनविभागातील कोपरगाव तालुक्यात बारामाही ऊस, मका, नेपियर गवत व फळबागांचे क्षेत्र आहे. गोदावरी या नदीच्या जवळ व पाणी असलेल्या भागात ऊसाच्या शेतीमुळे बिबट्यास कायम स्वरुपी लपण्याची जागा व पाण्याची सोय, उपलब्ध असणाऱ्या भक्ष्यामुळे बिबट्याने ऊसाचे शेतीचे भागात अधिवास तयार केला आहे. यामुळे ग्रामीण परिसरात बिबट्यांचा वावर दिसून येतो. बहुतांश भागामध्ये शेतकरी हे स्वत:चे शेतावर वस्ती करुन राहत असल्याने त्यांची पाळीव जनावरे गोठ्यात बांधलेली असतात. अश्या जनावरांच्या शोधामध्ये बिबट लोकवस्तीकडे येतात. शेतकरीही रात्री शेतामध्ये पिकांना पाणी देत असतात, यातून बिबट-मानव संघर्षच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

(२) अशा प्रकारची निवेदन विविध स्तरावरून प्राप्त झाली आहेत.मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतुदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.
(३) मानव-वन्यतीव संघर्ष कमी करण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:-• अहिल्यानगर वनविभागात बिबट आढळल्यास किंवा तक्रार आल्यास सदर क्षेत्रात व परिसरात तात्काळ वनकर्मचारी पाठवून जनजागृती करून स्थानिकांना सतर्क केले जाते.
• अहिल्यानगर व संगममनेर येथे प्रशिक्षित बचाव पथक कार्यरत आहे.
• वनकर्मचाऱ्यांकडून वाहने, पिंजरे, रेस्क्यू टिम ही साधन सामग्री आवश्यकतेप्रमाणे उपयोगात आणली जातात.
• परिसरात मानव-वन्यजीव संघर्ष घडू नये म्हणून संयुक्त वनव्यवस्थापन समिती व कर्मचाऱ्यांद्वारे वेळोवेळी जनजागृती करून वन्यप्राण्यांबाबत जनतेमध्ये भिती पसरणार नाही याची दक्षता घेतली जाते.
• वनकर्मचाऱ्यांकडून गस्त घातली जाते.
• वनकर्मचाऱ्यांकडून नागरिकांना बिबट्यापासून सावधगिरीचे ऊपाय समजावून सांगून गावामध्ये भित्तीपत्रके व जनजागृती फलक लावण्यात आलेले आहे.
• शाळांमध्ये कार्यशाळा घेऊन विद्यार्थ्यांना बिबट्यापासून सावधगिरीचे उपाय वनकर्मचाऱ्यांकडून सांगितले जात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.